आर.डी. कं.२०/२०१०
हबिबखान वि. शशिधरन
निशाणी - ३९

## सरतपासणी ॲड. श्री. एन.जी.जेठा - जेडीतर्फे-

१. शपथपत्रातील मजकुर माझे सांगण्याप्रमाणे लिहीलेला असुन, तो बरोबर व खरा आहे. त्यावर माझी सही आहे.

२. मी दरखास्तीसोबत खालीलप्रमाणे दस्ताऐवज दाखल केलेले आहेत.

१. वादग्रस्त मालमत्तेची आखिव पत्रिका अभिलेखावर दाखल केलेली आहे, ती आता मला दाखविण्यात आली, ती तीच असुन ती निशाणी ४६ वर आहे.

२. वादग्रस्त मालमत्तेचा नकाशा अभिलेखावर दाखल केलेला आहे, तो आता मला दाखविण्यात आला, तो तोच असुन ती निशाणी ४७ वर आहे.

## उलटतपासणी ॲड.एल.आर.मांडवकर - डिकी होल्डरतर्फे-

३. हे म्हणणे खरे आहे की, दस्त निशाणी ४६ मध्ये धनजीभाई वेलजीभाई पटेल यांचे नाव आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी दाव्यातील मालमत्तेचे विक्रीपत्र करून मिळावे म्हणुन धनजीभाई पटेल यांच्याविरूध्द दावा केला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या दाव्याचा दिवाणी दावा क्रमांक २५६/१९८८ असा होता. हे म्हणणे खरे आहे की, तो दावा कनिष्ठ न्यायालयाने खारिज केल्यामुळे मी त्याविरूध्द जिल्हा न्यायालयात अपिल दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्याचा क्रमांक दिवाणी अपिल कं.२७७/१९९९ असा होता. हे म्हणणे खरे आहे की, ते अपिल मा. जिल्हा न्यायालयाने खारिज केले होते. मी मा. जिल्हा न्यायालयाच्या आदेशाविरूध्द मा.उच्च न्यायालयामध्ये अपिल दाखल केले होते, ते देखील खारिज झाले होते.

४. हे म्हणणे खरे आहे की, धनजीभाई वेलजीभाई पटेल यांची मालमत्ता हबिबखान पठाण यांनी विकत घेतली आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादग्रस्त

मालमत्ता खरेदी केल्यासंबंधीची नोंद निशाणी ४६ मध्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की, हबिबखान पठाण यांच्या नावे फेरफारची नोंद दि.२४.११.२००४ रोजी झालेली आहे.

**ॲड. मांडवकर यांच्या तोंडी विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब**.

वा. दा. ब. अ. क. केले — माझे समक्ष

| | |
|---|---|
| **(डि.बी.गुट्टे)** | **(डि.बी.गुट्टे)** |
| सहदिवाणी न्याया.क.स्तर, उमरेड | सहदिवाणी न्याया.क.स्तर, उमरेड |
| दि.०७.०१.२०१७ | दि.०७.०१.२०१७. |